# "कोविड – १९ कालावधीतील आंबेगाव कृषी बाजारपेठेच्या व्यवस्थापनाचा अभ्यास"

**डॉ. उघडे एस. एस.**
वाणिज्य विभागप्रमुख अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, पुणे.
Email ID :-smughade@gmail.com

**प्रस्तावना**

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याचा अभ्यास करतांना प्रथम पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, हवामान यांची माहिती घेणे आवश्यक आहे. पुणे जिल्ह्याला ऐतिहासिक शैक्षणिक वारसा लाभला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पुणे जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान आहे, पुणे शहर ज्ञान, शिक्षण व औद्योगिकीकरण यांचे माहेरघर मानले जाते. अशा या पुणे जिल्ह्याच्या उत्तरेकडे आंबेगाव तालुका आहे प्राचीन व मध्ययुगीन काळात जुन्नर शहर व पुणे शहर ही शहरे महत्त्वपूर्ण होती यांच्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे महत्त्वाची भूमिका असणारा आंबेगाव तालुक्याचा परिसरही महत्वपूर्ण आहे पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी आंबेगाव तालुका हा एक आहे या तालुक्यात कृषी विषयक शेती मोठ्या प्रमाणात केली जाते १९६२ साली आंबेगाव पंचायत समितीची स्थापना करण्यात आली तेव्हापासून आंबेगाव या तालुक्याच्या ठिकाणाहून सर्व प्रशासन सुरू झाले सन १९८७ साली डिंबे धरणाच्या बांधकामासाठी पूर्तता झाल्यानंतर आंबेगाव तालुक्यात तेव्हापासून आज कोविड – १९परिस्थितीतही मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय आणि त्यावर आधारित इतर दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसाय, भाजीपाला व्यवसाय इत्यादी मोठ्या प्रमाणात चालू आहेत आणि कोविड – १९कालावधीतही इतर सर्व रोजगार बंद असतानाही आंबेगाव तालुक्यात शेतीपासून मिळणारे उत्पन्न चालू आहे अशा अनेक कृषिविषयक उत्पन्न असणाऱ्या बाजारपेठेचे व्यवस्थापन योग्य पद्धतीचे असल्यामुळे कोविड – १९कालावधीतही पुणे, मुंबईसारख्या शहरांमध्ये तसेच महाराष्ट्र राज्याबाहेरही कृषी विषयक शेतीचे उत्पादन आंबेगाव तालुक्यातून खरेदी - विक्री करून मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्गाने उत्पन्न मिळविलेले दिसून येते.

## संशोधनाची उद्दिष्टे

१) आंबेगाव बाजारपेठ ही संकल्पना अभ्यासणे.
२) कृषी आधारित व्यवसाय यांचा अभ्यास करणे.
३) कृषी उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

## आंबेगाव बाजारपेठ ही संकल्पना अभ्यासणे

पुणे जिल्ह्याच्या उत्तरेस पुण्यापासून ६० किलोमीटर अंतरावर मंचरशहर वजा गाव आहे. मंचरच्या पश्चिमेस ४५किलोमीटर अंतरावर आंबेगाव हे तालुक्याचे ठिकाण होते. परंतु आज घोडेगाव याठिकाणी आंबेगाव तालुक्याची सर्व प्रशासकीय कार्यालये काम करत आहेत कारण प्रत्यक्षात असणारे आंबेगाव हे ठिकाण डिंबे धरण क्षेत्रात पाण्याखाली गेले आहे. आंबेगाव पुनर्वसन करून घोडेगावच्या पश्चिमेस आंबेगाव गावठाण वसाहत स्थापन केली आहे. आंबेगाव सह्याद्रीच्या पर्वतरांगात असणाऱ्या आदिवासी समाजाची छोट्या-छोट्या खेड्यांची मोठी बाजारपेठ होती या बाजारपेठेत जुन्नर, आंबेगाव परिसरातील लोक मालाची खरेदी विक्रीसाठी एकत्र येत असत पूर्वी पासून खरेदी-विक्रीचा वारसा लाभलेल्या आंबेगाव तालुक्यात 'मंचर' शहर वजा गाव या ठिकाणी शेतीतील सर्व प्रकारचे तरकारी उत्पन्न मोठ्या प्रमाणात खरेदी- विक्री, लिलावासासाठी पुणे, मुंबई या मोठ्या शहरातील व्यापारी वर्ग एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात व्यवहार केला जात असे. आजही कोविड – १९कालावधीतही लाखो रुपयांचे व्यवहार होताना दिसून येतात शेतीतील सर्व प्रकारची उत्पादने मंचर या ठिकाणी आणून खरेदी-विक्रीचे रोज मोठ्या प्रमाणात व्यवहार केले जातात तसेच आंबेगाव या तालुक्यात शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो दुग्ध व्यवसाय कृषीपूरक व्यवसाय असला तरी काही कुटुंबांमध्ये मुख्य व्यवसाय म्हणूनही केला जातो पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज डेअरी, श्रीराम सहकारी दूध उत्पादक संस्था मर्यादित पिंपळगाव, पराग (गोवर्धन) डेअरी, भाग्यलक्ष्मी डेअरी अशा अनेक लहान मोठ्या दूध डेअरी अंतर्गत आधुनिक

तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक बाजारपेठेत मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी मदत होत आहे. भारतीय दुग्धजन्य पदार्थांचा जागतिक बाजारपेठेतील हिस्सा वाढविण्यासाठी गोवर्धन प्रयत्नशील आहे. दुग्धजन्य वेगवेगळे पदार्थ महाराष्ट्रातील सर्व बाजारपेठेबरोबर जागतिक बाजारपेठेपर्यंत वेगवेगळे उत्पादने पोहोचली आहेत तसेच सहकारी संस्था भीमाशंकर सहकारी साखर कारखाना पारगाव येथे आंबेगाव तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतीमधील उस कारखान्यात जात असल्याने कोविड – १९कालावधीत या मार्गाने ही उत्पन्न मिळत राहिले. त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर जास्त अडचणी कोविड – १९कालावधीमध्येही आल्या नाहीत.

आंबेगाव तालुका सातगाव पठार पूर्व भाग व पश्चिम भाग असा विभागला गेला आहे तालुक्यात एकूण १४२महसुली गावे असून १०३ग्रामपंचायती आहेत त्यापैकी २९ग्रुप ग्रामपंचायती आहेत. पंचायत समितीचे कार्यालय घोडेगाव येथे आहे. आंबेगाव तालुक्यात ५८आदिवासी गावे आहेत इ.स. सन २०११च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या २,३७,९५४एवढी आहे त्यापैकी ५०,७०४ ही आदिवासी समाजाची लोकसंख्या आहे तालुक्यातील मंचर, रांजणी, घोडेगाव, अवसरी, पिंपळगाव अशा गावांची लोकसंख्या जास्त आहे आंबेगाव तालुक्यातील १९५१ ते २०११ पर्यंत ची लोकसंख्या वाढ खालील तक्त्यात दिलेली आहे

**१९५१ ते २०११ पर्यंतची आंबेगाव तालुक्याची लोकसंख्या**

| सन | एकूण लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९५१ | ९८,८८० | ४८,८७६ | - |
| १९६१ | १,१८,७५६ | ५८,४२९ | ६०,३२७ |
| १९७१ | १,३९,३२४ | ६९,०६७ | ७०,२५७ |
| १९८१ | १,६०,७४६ | ७९,१२९ | ८१,५६७ |
| १९९१ | १,८६,८०९ | ९२,७४१ | ९४,०६८ |
| २००१ | २,१३,७८९ | १,०७,५५६ | १,०६,२३३ |
| २०११ | २,३७,९४५ | १,२१,३६७ | १,१६,५७८ |

**कृषी आधारित व्यवसाय यांचा अभ्यास करणे**

आंबेगाव तालुका हा डिंबे धरणामुळे शेतीप्रधान तालुका झालेला असल्याने कृषी आधारित व्यवसाय कोविड – १९या कालावधीत ही चालू राहिले आहेत कारण त्यांना मिळणारा कच्चामाल हा शेतीपूरक असल्यामुळे शेतीमधून तो सहजासहजी उपलब्ध होत असल्यामुळे अडचणी उद्भवल्या नाहीत असे व्यवसाय पुढील प्रमाणे सांगता येतील

**दुग्ध व्यवसाय**

शेतीला जोड धंदा म्हणून तालुक्यातील सर्वात मोठा व्यवसाय म्हणजे दुग्ध व्यवसाय आहे १९८० च्या पूर्वी या व्यवसायाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले जात नव्हते. कारण उन्हाळयात जनावरांचा चाऱ्याचा तुटवडा असायचा मात्र कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि डिंभे धरणाच्या निर्मितीनंतर शेतीसाठी पाण्याचे स्रोत उपलब्ध झाले त्यामुळे बारमाही चारा मिळू लागला आणि दुग्ध व्यवसायाला चालना मिळाली तालुक्यात एकूण ४५दुग्ध उत्पादन सोसायट्या आहेत या सोसायटीत दूध वाढणारा सभासद लहान, मध्यम व मोठे जमीन क्षेत्र असणारा आहे. लहान सभासदांकडे कमीत कमी ५ व मोठ्या सभासदांकडे ५० पर्यंत संकरित गाई आहेत. शेतकरी दररोज सरासरी ३०लिटर पासून ते ४०० लिटरपर्यंत दूध उत्पादन घेतात कोविड – १९या कालावधीतही हे उत्पादन चालूच आहे तालुक्यात उत्पादित होणाऱ्या दूध संकलनाचे काम सहकारी व खाजगी संस्था करत आहेत त्यामध्ये कात्रज डेअरी गोवर्धन पराग डेअरी सारथी दूध इत्यादी संस्था आहेत.

**कुकुट पालन**

ग्रामीण भागात अंडी व मांस खाण्यासाठी आणि आठवडा बाजाराला थोडीशी आर्थिक मदत मिळावी म्हणून प्रत्येक कुटुंबात कोंबड्या पाळल्या जात असत परंतु आज या घरगुती कोंबडी पालनाचे व्यवसायात रूपांतर झालेले दिसत आहे शेतकरी शेतीबरोबर कुक्कुटपालनाचा व्यवसाय करू लागला आहे तसेच काही गावांमध्ये स्वतंत्र कुक्कुटपालनाचा व्यवसाय केला जातो शासनाच्यावतीने बँका पतसंस्था या व्यवसायास कर्जपुरवठा करतात त्यामुळे आंबेगाव तालुक्यात कृषी पूरक व्यवसाय म्हणून कुक्कुट पालन केले जाते ते सन २०१४च्या पंचायत समिती सहकारी संस्थांच्या माहितीनुसार तालुक्यात एकूण १२०कुकूटपालन केंद्रे होती त्यामध्ये वाढ झालेली दिसून येते तालुक्यातील शेतकरी व तरुण वर्गांचा या व्यवसायाकडे चांगला कल दिसतो आहे या व्यवसायाबरोबरच वाहतूक व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, दुधापासून खवा बनवणारी छोटे उद्योग, मंगल कार्यालय इत्यादींचा विकास होत आहे. परिणामी लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे कोविड – १९कालावधीमध्ये देखील यामधील अनेक व्यवसाय

चालूच आहेत त्याचा फायदा आंबेगाव तालुक्यातील नागरिकांना झालेला दिसून येतो त्यामुळे शेतीपूरक व्यवसायाला चालना मिळत गेलेली आहे.

**सहकारी संस्था भीमाशंकर सहकारी साखर कारखाना**

सहकार चळवळीच्या प्रगतीत महाराष्ट्र राज्य हे अग्रगण्य राज्य समजले जाते सहकार चळवळ ही शेतकऱ्यांना मदत करणारी व दिलासा देणारी चळवळ आहे या चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात प्रगती झाली १९५०साली विठ्ठल राव विखे पाटील यांच्या पुढाकाराने व अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रेरणेने अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना सुरू झाला त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यात कारखाने उभे राहिले पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगाव तालुक्यात विघ्नहर सहकारी साखर कारखाना होता कारण जुन्नर तालुक्यात धरणांच्या निर्मितीमुळे शेतीक्षेत्र मोठ्या प्रमाणावर सिंचनाखाली आले होते पुढील काळात १९८० सालापासून आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणाचे काम सुरू होऊन २००० सालापर्यंत पूर्ण झाले या कालावधीच्या या कालव्याच्या व कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या माध्यमातून शेती क्षेत्र ओलिताखाली आले त्यामुळे पारंपारिक अन्नधान्यांच्या पिकाबरोबर नगदी पिकांचे ही शेतकरी उत्पादन घेऊ लागला ऊस उत्पादनाचे प्रमाणही वाढले त्यासाठी साखर कारखान्याची गरज होती ही गरज ओळखूनच आंबेगाव तालुक्याचे तत्कालीन आमदार दिलीपराव वळसे पाटील, दत्तात्रय वळसे पाटील, शिवाजीराव आढळराव पाटील,बी. डी. काळे इ. यांनी भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड पारगाव तालुका आंबेगाव जिल्हा पुणे या नावाने शासनाकडे प्रस्ताव सादर केला शासनाने दिनांक २२/०३/१९९४ साली औद्योगिक परवाना दिला. भीमाशंकर कारखान्याचे कार्यालय मंचर येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सुरू करण्यात आले. कारखान्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण आंबेगाव तालुका आहे .या अंतर्गत आजही कोविड – १९ चा विचार करता कारखान्यासाठी ऊस सर्व आंबेगाव तालुक्यातील शेतकरी वर्गाअंतर्गत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला पुरवला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या कारखान्यामुळे सुद्धा उत्पन्न मिळत आहे याचाही फायदा आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना झालेला आहे म्हणून शेती आधारित छोटे - मोठे व्यवसाय हे शेतीपूरक व्यवसाय म्हणून अतिशय महत्त्वाचे ठरतात.

**कृषी उत्पादनाच्या खरेदी-विक्रीचा अभ्यास करणे**

डिंबे धरणामुळे आंबेगाव तालुक्यात शेती विषयक अनेक प्रकारची पिके घेतली जातात. आजही म्हणजेच कोविड – १९या कालावधीत ही मोठ्या प्रमाणात घेतली जातात त्यामुळे चिकू, मिरची, गाजर, दुधी भोपळा, शेवगा, कारले, फरशी, कांदा, आले (अद्रक), काकडी, भेंडी, टोमॅटो, तोंडली, ढोबळी मिरची, घेवडा, पावटा, मका, लसुन, चवळी, बटाटा, दोडका, लिंबू, राजमा, वांगी, कोबी, वालवड, गवार, पापडी, बीट, फ्लॉवर इत्यादी प्रकारची पिके सातत्याने घेतली जातात मंचर येथे बाजारपेठेत आणून खरेदी-विक्रीचे व्यवहार कोविड – १९या कालावधीत ही मुंबई, पुणे येथील व्यापारी एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात व्यवहार करत आहेत बाजारपेठेचे व्यवस्थापन योग्य पद्धतीनचे असल्याने कोविड – १९या कालावधीतील सर्व कृषी व्यवहार सुरळीत चालू आहेत कृषी विषयक बाजारभाव हे बाजारपेठ नियमित चालू असल्यामुळे कमी - जास्त होताना दिसून येतात अशा कृषिविषयक बाजारभावाचा तक्ता पुढील प्रमाणे दिलेला आहे

**कृषिविषयक बाजारभाव तक्ता**

| तपशील | | १३/०६/२०२० | | | १३/११/२०२० | | | १३/०४/२०२१ | | | १३/०९/२०२१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.न.** | **वान** | **किमान** | **कमाल** | **सरासरी** | **किमान** | **कमाल** | **सरासरी** | **किमान** | **कमाल** | **सरासरी** | **किमान** | **कमाल** | **सरासरी** |
| १ | चिक्कू | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | १०० | २२० | १६० | २५० | २५० | २५० |
| २ | मिरची | १०० | ५५० | ३२५ | २०० | ६०० | ४०० | १५० | ७२२ | ४३६ | ५० | २५० | १५० |
| ३ | गाजर | २० | १२० | ७० | २० | ३०० | १६० | २० | ६० | ४० | २० | २१५ | ११७.५ |
| ४ | दुधीभोपळा | १० | १०० | ५५ | १० | १०० | ५५ | २० | ८० | ५० | ६० | १६० | ११० |
| ५ | शेवगा | २०० | ५०० | ३५० | ४५० | ४५० | ४५० | १०० | २०० | १५० | २०० | ३०० | २५० |
| ६ | कारले | २०० | ३८० | २९० | १०० | ४०० | २५० | २५० | ३५० | ३०० | ५० | १५० | १०० |
| ७ | फरशी | ३०० | ५२५ | ४१२. | ३५० | ५०० | ४२५ | ४०० | ४५० | ४२५ | ८० | ४३० | २५५ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५ | | | | | | | | | |
| ८ | कांदा | ७० | ५०० | २८५० | ३० | ४५१ | २४०.५ | १० | ११० | ६० | २५ | १६० | ९२.५ |
| ९ | आले(आद्रक) | १२५ | २०० | १६२.५ | १०० | २५० | १७५ | २०० | २०० | २०० | ५० | २५० | १५० |
| १० | काकडी | १० | २०१ | १०५.५ | १० | ८० | ४५ | २० | १३० | ७५ | २० | १५१ | ८५.५ |
| ११ | भेंडी | ५० | ४०१ | २२५.५ | ५० | ४५० | २५० | ४०० | ५१५ | ४५७.५ | ५० | २०० | १२५ |
| १२ | टोमॅटो | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ५० | २५० | १५० | ४० | २०० | १२० |
| १३ | तोंडली | १०० | ३२१ | २१०.५ | ५० | ४०० | २२५ | १०० | ३२० | २१० | ५० | ३०० | १७४ |
| १४ | ढोबळी मिरची | १०० | ४०० | २५० | १५० | ४०० | २७५ | १०० | ३५० | २२५ | ५० | २०० | १२५ |
| १५ | घेवडा | १०० | ५०० | ३०० | ३५० | ५०० | ४२५ | ८० | ५५० | ३१५ | १२० | ३९० | २५५ |
| १६ | पावटा | ४५० | ५५० | ५०० | १०० | ६५० | ३७५ | २५० | ४५१ | ३५०.५ | १०० | २०० | १२५ |
| १७ | मका | १०० | ३५० | २२५ | ८० | ५०० | २९० | ८० | १८० | १३० | ५० | १५० | १०० |
| १८ | लसून | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ४०० | ४०० | ४०० | १०० | ५०० | ३०० |
| १९ | चवळी | ५० | ४९५ | २७२.५ | ५० | ४८० | २६५ | १०० | ३५० | २२५ | १० | ३०० | १५५ |
| २० | बटाटा | ३० | ३२० | १७५ | ४० | ३०० | १७० | ३० | १३० | ८० | २० | १४० | ८० |
| २१ | दोडका | ४० | ३६० | २०० | ७० | ३५० | २१० | १२० | ४०० | २६० | ७० | १७० | १२० |
| २२ | लिंबू | १२० | १५० | ३०० | १०० | १२० | ११० | ५५० | ६०० | ५७५ | ३०० | ३०० | ३०० |
| २३ | राजमा | ७०० | ८५० | ७७५ | ६०० | ७५० | ६७५ | ३६० | ४०० | ३८० | २०० | ४५० | ३२५ |
| २४ | वांगी | ५० | ५०० | २७५ | ५० | ५०० | २७५ | १० | २१० | ११० | ५० | २५१ | १५०.५ |
| २५ | कोबी | १०० | २३० | १६५ | १०० | २५५ | १७७.५ | २० | ६५ | ४२.५ | १० | २० | २५ |
| २६ | वालवड | ४०० | ४३० | ४१५ | ३०० | ४५० | ३७५ | ४६० | ४६० | ४६० | २८० | ३२१ | ३००.५ |
| २७ | गवार | ५० | ५५१ | ३००.५ | ५० | ५५० | ३०० | ८० | ५५० | ३१५ | ५० | ७०० | ३७५ |
| २८ | पापडी | ३५० | ४४० | ३९५ | ३६० | ४२१ | ३९०.५ | १५० | ४२१ | २८५.५ | २०० | २९८ | २४९ |
| २९ | बीट | ४० | ५५१ | २९५.५ | ५० | ६०० | ३२५ | ३५ | २२५ | १३० | १० | १४४ | ७७ |
| ३० | फ्लॉवर | ३० | ४५० | २४० | २० | १६५ | ९२.५ | २० | १५२ | ८६ | १० | २६५ | १३७.५ |

वरील तक्त्यात सर्व कृषीविषयक बाजारभाव दिनांक १३जून २०२०ते दिनांक १३सप्टेंबर २०२१या कालावधीत झालेल्या कृषी विषयक व्यवहारांचे आहेत सर्व कृषीविषयक मालाचे किमान, कमाल आणि सरासरी असे बाजारभाव दिलेले आहेत यामध्ये चिकू - सरासरी ३००, ३००, १६०,२५०,मिरची –सरासरी ३२५, ४००, ४३६, १५०, टोमॅटो– सरासरी ४०, ४०, १५०, १२०,दोडका - सरासरी २००, २१०, २६०, १२०, बीट– सरासरी २९५.५, ३२५, १३०, ७७याप्रमाणे प्रत्येक कृषिविषयक मालामध्येकोविड – १९ या कालावधीमध्ये प्रत्येक मालाच्या बाजारभावात सातत्याने चढ-उतार होताना दिसून येतात हे बाजार भाव सातत्याने कोविड – १९ या

प्रादुर्भावामुळे कमी-जास्त होत आहेत काही मालाचे बाजारभाव वाढतात काही कमी होतात यामधून शेतकरी वर्गही आपल्याला उत्पन्न मिळवून घेत आहे.

**निष्कर्ष**

आंबेगाव तालुक्यातील कृषिविषयक व्यवस्थापन योग्य पद्धतीने असल्यामुळे कोविड – १९ या कालावधीमध्ये सुद्धा मुंबई, पुणे यासारख्या ठिकाणाहून सर्व व्यापारी वर्ग आणि शेतकरी वर्ग एकत्र येऊन सर्व कृषी विषयक मालाचे व्यवहार, लिलाव केले जात असल्याने कोविड – १९ कालावधीतही आंबेगाव येथील शेतकऱ्यांना उत्पन्नाचे मार्ग चालूच राहिले तसेच शेतीपूरक दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व्यवसाय अश्या अनेक छोट्या - मोठ्या सर्व व्यवसायापासून आंबेगाव तालुक्यातील जनतेला रोजगाराच्या संधी मिळत राहिल्या तसेच कृषी विषयक सर्व कार्य सातत्याने चालूच आहेत त्याचा फायदा शेतकरी वर्ग, व्यापारी वर्ग या सर्वांनाच झालेला दिसून येतो.

**संदर्भ सूची**

१) डॉ. संतोष जाधव, २०१९, आंबेगाव तालुक्याचा इतिहास,सनय प्रकाशन, नारायणगाव.
२) Cencus Report, 2011.
३) महाराष्ट्र शासन कृषी विभाग, पंचायत समिती, आंबेगाव (घोडेगाव), संक्षिप्त टिपणी, २/६/२०१४.
४) कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर online App.
५) ५६ वा वार्षिक अहवाल, पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित कात्रज दुग्धालय, पुणे, २०१४-१५.
६) https://en.wikipedia.org/wiki/Ambegaon_taluka